धावते नवनगर | मंगळवार, ८ नोव्हेंबर २०११ | नवी मुंबई

# प्रभाग क्र.५३ मध्ये नागरी कामांचा शुभारंभ

**नवी मुंबई ।** प्रतिनिधी

ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गणेश नाईक यांच्या हस्ते आज प्रभाग क्रमांक ५३ चे नगरसेवक वैभव गायकवाड यांच्या प्रभागात विविध नागरी कामांचा शुभारंभ करण्यात आला. रस्ता रुंदीकरण आणि डांबरीकरण, इंटर ब्लॉक बसविणे आदि कामांचा यात समावेश आहे. तसेच ना. नाईक यांच्या आमदार निधीतून या प्रभागात झाडांभोवती ग्रेनाइटचे कठडेही बांधण्यात येत आहेत. या कामाचे उद्घाटनही यावेळी ना. नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. उपमहापौर भरत नखाते, स्थायी समिती सभापती रमेश शिंदे तसेच प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने याठिकाणी उपस्थित होते.



पेव्हरब्लॉक आणि रस्ते रुंदीकरण कामाचा शुभारंभ करताना ना. गणेश नाईक



आमदारनिधीतून झाडांभोवती ग्रॅनाईटचे कठडे बांधण्यात आले आहे

वाशी सेक्टर ३ येथील सुमंगल सोसायटीजवळ हा कार्यक्रम पार पडला. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रभागातील समस्या नगरसेवक वैभव गायकवाड यांच्या नगरसेवक निधीतून आणि त्यांच्या सातत्याच्या पाठपुराव्यामुळे मार्गी लागल्या आहेत. आज या कामांचा ना. नाईक यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. सुमंगल सोसायटी आणि बी३-११ ते बि३-२० इमारतीच्या अंतर्गत इंटरब्लॉक बसविणे, सेक्टर ३ मधील सूर्या, कावेरी, महाराजा, सुमंगल, बी३ कंपाउंड, एमएसईबी वसाहत, शांतीनिकेतन सोसायटी येथील रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात असल्याची माहिती नगरसवेक गायकवाड यांनी दिली. याचबरोबर ना. नाईक यांच्या आमदार निधीतून प्रभाग क्रमांक ५३ मधील झाडांना मजबुती आणि आधार देण्यासाठी झाडांभोवती ग्रेनाइटचे कठडेही बांधण्यात येत असल्याचेही नगरसेवक गायकवाड यांनी सांगितले.

नगरसेवक वैभव गायकवाड हे पदवीधर असल्यामुळे दूरदृष्टी विचारात घेवून त्यांना संधी देण्यात आली. प्रभागा चांगल्या प्रकारची कामे करून ते हाती आलेल्या संधीचे सोने करीत असल्याचे मनोगत ना. नाईक यांनी यावेळी व्यक्त केले. प्रभागातील नागरिकांनी आपल्या जीर्ण झालेल्या इमारतींचे गाऱ्हाणे यावेळी पालकमंत्र्यांसमोर मांडले. लवकरच शहरातील सर्व धोकादायक इमारतींचा प्रश्न सोडविला जाईल असे आश्वासन ना. नाईक यांनी नागरिकांना दिले.